महाराष्ट्र शासन

क्र.कअनि १११९/प्र.क्र.४९/१४-ब
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ०७.०८.२०१९

प्रति,

सह/उप सचिव (आस्थापना),
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय - पुराभिलेख संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील सहाय्यक संचालक (गट ब) या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत

संदर्भ:- सा.प्र.वि.शा.नि.क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२०/कार्या-१४, दिनांक ३१.०८.२०१७

महोदय/ महोदया,

मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीबाबत कार्यपध्दती संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील पुराभिलेख संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील सहाय्यक संचालक (गट ब) वेतनस्तर एस १५(४१८००-१३२३००) हे पद मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गामधून प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे. यासंदर्भात संदर्भाधीन शासन निर्णयातील कार्यपध्दतीस अनुसरून पुराभिलेख संचालनालय व अधिनस्त कार्यालयातील सहाय्यक संचालक हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकाऱ्यांकडून इच्छूकता मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	पुराभिलेख संचालनालय कार्यालय	रिक्त पदे
१	मुख्य कार्यालय, मुंबई	०२
२	विभागीय कार्यालय, पुणे	०१
३	विभागीय कार्यालय, कोल्हापूर	०१
४	विभागीय कार्यालय, नागपूर	०१
५	विभागीय कार्यालय, औरंगाबाद	०१
	एकूण	०६

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पत्र आपल्या विभागाच्या आस्थापनेवरील कक्ष अधिका-यांच्या तत्काळ निदर्शनास आणावे. त्यानुसार प्रतिनियुक्तीसाठी इच्छूकता दर्शविलेल्या कक्ष अधिका-यांची सोबतच्या विवरणपत्रामधील माहिती विभागाच्या सचिवांच्या मान्यतेने या विभागास दिनांक २०.०८.२०१९ पर्यंत उपलब्ध करून द्यावी. इच्छुक कक्ष अधिकारी यांनी एकदा दर्शविलेली इच्छुकता परत मागे घेता येणार नाही.

३. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०८०७१५१६५९४७०७ असा आहे. सदर पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

आपला,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.08.07 15:23:08 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रत,

कक्ष अधिकारी (सां.का.-२), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

विवरणपत्र

वैयक्तिक माहिती

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा</th><th>तपशिल/अभिप्राय</th></tr>
<tr><td>१</td><td>अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>जन्मदिनांक</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>शैक्षणिक अर्हता</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छांयाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत.)</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>मत्ता व दायित्वे सादर केली आहेत का?</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>पदोन्नतीच्या विचारक्षेत्रात आहे का?</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>संबंधित अधिकाऱ्याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद व कालावधी)</td><td><table>
<tr><td>दिनांकापासून ते दिनांकापर्यंत</td><td>पद</td><td>प्रतिनियुक्तीचे ठिकाण</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td></td></tr>
<tr><td colspan="3">एकूण कालावधी</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>९</td><td>मागील प्रतिनियुक्तीवरून परत आल्याच्या दिनांकापासून ५ वर्षे पूर्ण झाली आहेत का?</td><td></td></tr>
<tr><td>१०</td><td>संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>११</td><td>प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे.</td><td></td></tr>
</table>